MHLA050012192009

## लवाद प्रकरण नियमीत वसुली अर्ज क्र.१२७/२००९ मधील नि.क्र.३१० खालील आदेश

**[ उस्मानाबाद जनता सहकारी बँक, शाखा-अहमदपूर**

**..वि..**

**अविनाश माधवराव पाटील व इतर ]**

प्रस्तुत अर्ज दरखास्तदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम-२१ नियम-३७ अन्वये दिलेला आहे. दरखास्तदार यांचे कर्ज रक्कम रुपये ३,५६,५९,३६१/- आणि त्यावरील व्याज जाबदार क्र.१ ते ५ यांच्याकडून येणे बाकी असल्याबद्दल निकाल झालेला आहे. त्यांनी सदर रक्कम भरलेली नाही. यासाठी पुरेसा अवधी त्यांना देऊन झालेला आहे. जाबदार क्र.१ ते ५ हे रक्कम देऊ इच्छीत नाहीत हे स्पष्ट आहे म्हणुन जाबदार क्र.१, ३ ते ५ यांना दिवाणी तुरुंगात ठेवण्यातबद्दल आदेश व्हावा अशी विनंती करण्यात आली आहे. सोबत दरखास्तदारातर्फे शाखाधिकारी बालाजी सुर्यवंशी यांचे शपथपत्र सादर करण्यात आले आहे.

२. नि.क्र.३१२ लगत जाबदार क्र.४ आणि ५ यांनी आपले म्हणणे सादर केलेले आहे. रुपये ३,५६,५९,३६१/- एवढी रक्कम कर्जापोटी जाबदार देणे लागत नाही. जाबदार क्र.१ ते ३ हे मुख्य कर्जदार असुन जाबदार क्र.४ हा जामीनदार आणि गहाण देणारा आहे. जाबदार क्र.५ याने वैयक्तिक जामीन दिलेला आहे. जाबदार क्र.१ ते ३ यांनी कर्ज घेतेवेळी त्यांच्या एकुण मिळकती दरखास्तदार यांच्याकडे नमुद केल्या असुन त्यावर बोजा चढविलेला आहे. गट क्र.१३९/ख मधील १हेक्टर:२१आर ही दरखास्तदाराकडे गहाण आहे. जाबदार क्र.२ याचे घर क्र.९४/ए/१ हे सुध्दा बँकेकडे तारण आहे. जाबदार क्र.१ आणि ४ यांनी गट क्र.८१/१/१ या अहमदपूर येथील ९०आर चे सुध्दा

तारण घेत बँकेला कर्जाच्या सुरक्षिततेपोटी दिलेले आहे. जाबदार क्र.१ हे मक्तेदार असुन त्यांच्या अनेक मिळकती आहेत. जाबदार क्र.२ यांच्या मिळकती बँकेने लिलावाने विकलेली आहे आणि लिलावाची रक्कम रुपये १७,००,०००/- त्यांच्याकडे जमा आहे. जाबदार क्र.१ याने बँकेकडे जवळपास ६०,००,०००/- रुपयांची रक्कम जमा केलेली आहे. याकामी नि.क्र.२१९, २२३, ४६, २५७ व २९७ हे निर्णीत होणे बाकी आहेत. दरखास्तदार/बँक जाबदार क्र.४ आणि ५ यांनी जाबदार क्र.१ आणि ३ यांच्या विविध मिळकती जप्त करण्याच्या अर्जास वेळकाढुपणा करतात. त्यामुळे जाणीवपुर्वक दिलेला सदरचा अर्ज रद्द करावा अशी विनंती करण्यात आली.

**३.** जाबदार क्र.१ ते ३ यांनी या अर्जास नि.क्र.३१३ लगत म्हणणे दिले. १६% दराने मुळ कर्ज असताना लवादाने २१% दराने आदेश पारीत केला. जाबदार क्र.१ याने एकुण ५५,०१,११७/- एवढी रक्कम दरखास्तदाराला वेगवेगळया तारखांना दिलेली आहे. दरखास्तदार यांनी नि.क्र.२३ लगत अहमदपूर येथील गट क्र.८१/१/१ ही लिलावाने विक्री करण्यासाठी परवानगी मागितली होती. ती परवानगी मंजुर होऊन जागेचा ताबा न्यायालयाने मिळविला मात्र त्या मिळकतीबाबत रे.दि.मु.क्र.११/२००९ हा दावा चालु असताना त्यामध्ये दरखास्तदार/बँक प्रतिवादी असुनही त्यांनी कैफियत दिली नाही. सदरची मिळकत मौल्यवान असुन ती मिळकत विकुन बँकेची रक्कम भरण्यास जाबदार तयार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती करण्यात आली.

**४.** याकामी दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जावर दरखास्तीतील हरकतदार यांनी जाबदारांना तुरुंगात धाडण्यास हरकत नाही असे म्हणणे दिले.

**५.** जाबदार क्र.४ आणि ५ यांनी नमुद केल्यानुसार, जाबदार क्र.१ ते ३ यांच्या मालकीचा गट क्र.१३९ १हेक्टर:२१आर आणि गट क्र.८१/१/१ या मौजे अहमदपूर येथील मिळकती जप्त करुन विकल्यास त्यातून दरखास्तदाराची भरपाई होऊ शकेल ही परिस्थिती असली तरीही याकामी रे.दि.मु.क्र.११/२००९ मध्ये गट क्र.८१/१/१ ही दावा मिळकत आहे, हि वस्तुस्थिती नाकारता येत नाही. जाबदार क्र.१ ते ३ यांनी दरखास्तदार बँकेकडून कर्ज घेतल्यानंतर त्याची परतफेड न करता सदर दरखास्तीमध्ये त्यांच्याविरुध्द दिवाणी तुरुंगाचा आदेश मिळविण्यासाठी अर्ज देण्यास भाग पाडले. याकामी दरखास्तदार बँकेने घर क्र.९४/ए/१ लिलावाने विकुन त्याची रक्कम रुपये १७,००,०००/- जमा करुन घेतलेली आहे. मात्र येणे बाकी रक्कम विचारात घेता सदर १७,००,०००/- रक्कम ही फार अपुरी आहे. जाबदार क्र.१ ते ३ यांनी प्रथमत: सदर रक्कम देणे गरजेचे होते. जाबदार क्र.४ आणि ५ हे त्यांना जामीनदार जरी असले तरी एकत्रीत आणि सामुदायीकरीत्या सदरची रक्कम त्यांनी फेडणे आवश्यक होते. सदरचे कर्ज हे २० वर्षाहुन अधिक जुने आहे. दरखास्तदार ही सहकारी बँक आहे. रे.दि.मु.क्र.११/२००९ मधील मिळकतींमधील संबंधीतांचे हक्क अद्यापी शाबीत झालेले नाहीत. त्यामुळे त्यातील मिळकत सरसकट याकामी जप्त करणे योग्य होणार नाही. अशा परिस्थितीत, सामनेवाला क्र.१ ते ३ यांची संपुर्ण मिळकत जी कर्ज भागविण्यास पुरेशी ठरु शकेल अशा मिळकतीची यादी तयार करुन तिचा लिलाव जाहीर करावा त्यातुनही रक्कम जर भागली नाही तर जाबदार क्र.१, ३ ते ५ यांना दिवाणी तुरुंगात ठेवण्यात येईल. सदर दरखास्तदार यांनी जाबदार क्र.१ ते ५ यांच्या विक्रीस योग्य मिळकतीचा तपशील पुढील तारखेपर्यंत सादर करावा. अशी मिळकत जर नसेल तर तातडीने त्याबद्दल दरखास्तदार यांनी जबाबदार अधिका-याचे शपथपत्र स्वत:तर्फे दाखल करावे. त्यानंतर जाबदार

क्र.१, ३ ते ५ यांना दिवाणी तुरुंगात पाठविण्यासाठी ७ दिवसांचा निर्वाह भत्ता न्यायालयात जमा करावा. जेणेकरुन त्यांच्याविरुध्द दिवाणी तुरुंगात पाठविण्याविषयी आवश्यक वारंट देता येईल.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक:१७/०३/२०२५.** **[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.